**ठळक बातम्या**

- केंद्रीय निवडणूक आयोग आज महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकींच्या कार्यक्रमाची घोषणा करणार
- विधान परिषदेवरच्या राज्यपालनियुक्त ७ सदस्यांनी आज घेतली शपथ
- राज्यातल्या आणखी ६ जातींना केंद्राच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट करण्याची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची शिफारस

**आणि**

- नैऋत्य मोसमी पावसाची देशातून माघार, आग्नेय द्विपकल्पात ईशान्य मोसमी पाऊस सुरू

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकींची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोग आज करणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोग दुपारी साडेतीन वाजता नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत या दोन्ही राज्यांचं निवडणूक वेळापत्रक जाहीर करेल. त्यानंतर लगेचच आचारसंहिता लागू होईल.

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ पुढील महिन्याच्या २६ तारखेला तर झारखंडचा जानेवारीच्या ५ तारखेला संपणार आहे.  २०१९ मध्ये राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २१ ऑक्टोबर रोजी मतदान होऊन २४ ऑक्टोबरला मतमोजणी झाली होती. त्यावेळी ६१ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदान झालं होतं.

**<><><><><>**

विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांनी आज शपथ घेतली. त्यात चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे.

विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात त्यांना शपथ दिली. विधानपरिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ५ जागा अजून रिक्त आहेत.

दरम्यान या नियुक्त्यांना विरोध करणारी याचिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी न्यायालयाने निकाल राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या केल्याचं या याचिकेत म्हटलं होतं. मात्र, राज्यपाल निर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीला कोणत्याही प्रकारची हंगामी स्थगिती नव्हती किंवा सरकारनेही या नियुक्त्या करणार नाही अशी हमी दिली नव्हती. त्यामुळे आम्ही १२ पैकी ७ जणांच्या नियुक्त्या केल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयात दिली. या प्रकरणी अंतिम निर्णय देताना याबाबत आपलं मत देऊ असं उच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं राज्यातल्या आणखी सहा जाती केंद्राच्या इतर मागासवर्गिय सूचीत सामिल करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. कुलवंत वाणी, कुणबी वाणी, कराडी, कानोडी किंवा कनाडी, नेवेवाणी, सलमानी, तसंच निषाद - मल्ला - मल्लाह किंवा नाविक या सहा जातींचा समावेश केंद्राच्या सूचीत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं आयोगाकडे पाठवला होता. त्यावर गेल्यावर्षी १७ ऑक्टोबरला तसंच यावर्षी २६ जूनला मुंबईत आयोगानं जनसुनावणी घेतली त्यात सर्व कागदपत्र योग्य आढळल्यानं केंद्र सरकारला ही शिफारस केली असल्याचं राष्ट्रीय मागासर्ग आयोगानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज अखिल भारतीय काँग्रेस समितीचे वरिष्ठ निरीक्षक आणि वरिष्ठ निवडणूक समन्वयकांची नेमणूक केली

आहे. मुंबई आणि कोकण विभागाचे निरीक्षक म्हणून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गहलोत आणि डॉ. जी. परमेश्वर काम पाहतील. विदर्भासाठी भूपेश बघेल, चरणजीत सिंह चन्नी आणि उमंग सिंघर, तर मराठवाड्यात सचिन पायलट आणि उत्तम कुमार रेड्डी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रात टी. एस. सिंगदेव आणि एम. बी. पाटील, तर उत्तर महाराष्ट्रासाठी सईद नसीर हुसेन आणि डॉ. अनसुया सीताक्का यांच्याकडे निरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आल्याचं काँग्रेसनं पत्रकाद्वारे जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेसच्या विधानसभा निरीक्षकांची बैठक आज मुंबईत टिळक भवन इथं झाली. काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीला काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सह प्रभारी बी एम संदिप, यशोमती ठाकूर, उपस्थित होते.

**<><><><><>**

इगतपुरी विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं. दरम्यान, हिरामण खोसकर यांनी लोकसभा निवडणुकीत आणि त्यानंतरही पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत काँग्रेसने त्यांना सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे.

**<><><><><>**

भाजपाचे माजी आमदार धृपदराव सावळे आणि अविनाश घाटे यांच्यासह वंचित बहुजन आघाडी, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी काल मुंबईत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मनसे◌ेचे राज्य उपाध्यक्ष विठ्ठल लोखंडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे कमाल फारुखी, उमर फारुखी, वंचित बहुजन आघाडीचे रेहमान खान, माजी नगराध्यक्ष जम्मूसेठ यांचा यात समावेश आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच

विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला येईल, असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे ३१ खासदार निवडून आल्यानंतर महायुती सरकारला लाडकी बहीण आठवली, अशी उपरोधिक टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. सातारा जिल्ह्यातल्या फलटण इथं आयोजित मेळाव्यात ते काल बोलत होते. यावेळी सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर आणि फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

<><><><><>

शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीत धान आणि भरडधान्य विक्री करावी लागू नये म्हणून नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचा शासन निर्णय आज जाहीर करण्यात आला. आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीत कुणी खरेदी करत असेल तर हा कक्ष त्यावर नियंत्रण ठेवेल. त्यानुसार राज्यात खरेदी केंद्र सुरू करण्याचे आणि किमान आधारभूत किमतीत धान्य खरेदी करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यानुसार राज्यामध्ये केंद्र शासनाची नोडल एजन्सी म्हणून भारतीय अन्न महामंडळ काम पाहील, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी या भरडधान्यांच्या खरेदीची मुख्य जबाबदारी मुख्य अभिकर्ता संस्थांवर असेल, खरेदी केलेलं भरडधान्य भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांमध्ये साठवलं जाईल आदी आदेश देण्यात आले आहेत.

<><><><><>

देवळाली ते दानापूर या शेतकरी समृद्धी विशेष गाडीला आज रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून  हिरवा झेंडा दाखवला. या गाडीमुळे शेतकऱ्यांना केवळ प्रतिकिलो चार रुपये या माफक दरात मालवाहतूक

करता येईल असं वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्रातल्या दहा स्थानकांचा अमृत स्थानक म्हणून विकास होईल असंही ते म्हणाले. दहा जनरल डबे आणि पार्सल व्हॅन असणारी ही गाडी नाशिकच्या देवळालीहून निघून बिहारमध्ये दानापूरला जाईल तर परतीच्या प्रवासात मनमाडला शेवटचा थांबा घेईल. राज्यातल्या शेतकऱ्यांना नाशवंत माल दुसऱ्या राज्यात वाहून नेणं या गाडीमुळे सोयीस्कर होईल.

**<><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या निफाड तालुक्यामधल्या राजकीय दृष्ट्या संवेदनशील तसंच कांद्याची बाजारपेठ असलेल्या पिंपळगाव बसवंत शहराला नगर परिषदेचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागानं या संदर्भात काल अधिसूचना जारी केली. त्यामुळे इथली ग्रामपंचायत बरखास्त करण्यात येणार आहे.

**<><><><>**

धुळे शहर विधानसभा मतदारसंघात आयात उमेदवाराला सहकार्य केलं जाणार नाही असा स्पष्ट इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगरप्रमुख सुशिल महाजन यांनी आज वार्ताहर परिषदेत दिला.

**<><><><>**

ज्येष्ठ भाजपा नेते आणि माजी मंत्री मधुकर पिचड यांना ब्रेन स्ट्रोकमुळे नाशिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांना अहिल्यानगर इथल्या घरी असताना अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

मानखुर्दमधल्या आगरवाडी  आज कौशल्य विकास, उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी भवनाचं  भूमीपूजन केलं. या भवनामुळे मुंबईतील सर्व महिला बाल विकासासंदर्भातील सर्व कार्यालये  एका छताखाली येणार आहेत.  यावेळी  बोलताना लोढा यांनी एका वर्षाच्या आत या भवनाचं उद्घाटन होईल अशी ग्वाही दिली.

<><><><><>

ठाण्यात शालेय कर्मचाऱ्याची रोखलेली दोन वर्षांची वेतनवाढ पूर्ववत करण्यासाठी लाच स्वीकारणाऱ्या एकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं काल रंगेहाथ पकडलं. ठाण्यातल्या किन्हवलीच्या शहा चंदुलाल सरुपचंद विद्यालयाचा संचालक तसंच सहसचिव चंद्रकांत धानके यानं याकामासाठी एक लाख दहा हजार रुपयांची लाच मागितली होती.

<><><><><>

पद्मश्री दया पवार स्मृति पुरस्कार या वर्षी आशालता कांबळे, शाहू पाटोळे, सुकन्या शांता आणि अरुणा सबाने यांना जाहीर झाला आहे. येत्या रविवारी मुंबईत हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

प्राध्यापक आशालता कांबळे या फुले-आंबेडकरी चळवळीतील एक तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्या तसंच संविधान मूल्यांचं साहित्य लिहिणाऱ्या लेखिका म्हणून परिचित आहेत.

पुरस्काराचे दुसरी मानकरी शाहू पाटोळे यांनी दलितांच्या खाद्य इतिहासाबाबत 'अन्न हे अपूर्णब्रह्म' हे पुस्तक लिहिलं असून हे पुस्तक इंग्रजीतही प्रकाशित झालं आहे. पाटोळे हे भारतीय माहिती सेवेतील निवृत्त अधिकारी असून त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनसारख्या संस्थांमध्ये काम केलं आहे.

पुरस्काराच्या तिसऱ्या मानकरी सुकन्या शांता यांनी विविध राज्यांमधल्या तुरुंगात होणाऱ्या जातीआधारित भेदभावावर संशोधन करून सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

<><><><><>

नवी दिल्ली इथं झालेल्या I S S F नेमबाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या सोनम म्हसकर हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात आज रौप्य पदक जिंकलं. बावीस वर्षांच्या सोनमने २५२ पूर्णांक ९ गुण मिळवत आपलं पदक निश्चित केलं.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पावसानं आज संपूर्ण देशातून माघार घेतली, त्याचवेळी अग्नेय द्विपकल्पात ईशान्य मोसमी पाऊस सुरु झाला आहे.

बंगालच्या उपसागरात दक्षिणेच्या मध्य भागात कमी दाबाचं लक्षणीय क्षेत्र तयार झालं आहे.